महाराष्ट्र शासन
जिल्हा नियोजन समिती
जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर जिल्हा

दुरध्वनी क्र. (022)
(का) 26550066
eMail-
dpomsd@gmail.com

क्र.जिनिस/आस्थाविका/हस्तांतरण/प्र.क्र.-६२/२०१९-२०/४३२१ दि.१३.१२.२०१९

## ज्ञापन

**विषय:-आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत बांधण्यात आलेल्या मालमत्ता/वास्तुंची देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी नोंदणीकृत सामाजिक/ विश्वस्त संस्था यांच्याकडे सोपविणेबाबत . . .**

खालील तक्त्यात नमुद केलेली वास्तू सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत बांधण्यात आलेली आहे. सदरची वास्तू देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी नोंदणीकृत सामाजिक/ विश्वस्त संस्था यांच्याकडे सोपविण्याचे विचाराधीन आहे.

| अ. क्र. | मंजुर कामाचे ठिकाण व कामाचे स्वरुप | वास्तूच्या वापराचे वार्षिक भाडे (रुपये) | शेरा |
|---|---|---|---|
| १ | इंफट जिजेस स्कूल जवळ, अहिंसा रोड, मालाड (पश्चिम) येथील व्यायाम शाळा. | रु.५७६००/- अक्षरी रु.सत्तावन हजार सहाशे मात्र | - |

नियोजन विभाग, शासन परिपत्रक क्र. स्थाविका-०११८/प्र.क्र.५/का.१४८२, दिनांक १९ मार्च, २०१८ मधील तरतुदींनुसार सदरची वास्तू देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी खालील अटी व शर्तीची पुर्तता कर-या नोंदणीकृत सामाजिक/ विश्वस्त संस्था यांच्याकडून विहीत नमुण्यात अर्ज मागविण्यात येत आहे.

1. सामाजिक/ विश्वस्त संस्था ही मुंबई विश्वस्त अधिनियम, १९५० किंवा संस्था नोंदणी अधिनियम, १८६० खाली नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.
2. सामाजिक/ विश्वस्त संस्थेकडे सनदी लेखापाल यांचेकडे केलेल्या ३ वर्षातील लेखापरिक्षण अहवाल असणे आवश्यक आहे.
3. सामाजिक/ विश्वस्त संस्थेचा प्रमुख उद्देश ना-नफा ना-तोटा या तत्वावर सामाजिक कार्य करणे, अशा स्वरुपाचा असणे आवश्यक आहे.
4. सामाजिक/ विश्वस्त संस्थेच्या सभासदांवर फौजदारी कोर्टात गुन्हे सिध्द झालेले नसावे.

विहीत नमुण्यातील अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्याची अंतिम दि-०३/०१/२०२० अशी आहे. या तारखेनंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

विहीत नमुना, संस्थेची जबाबदारी, वास्तू देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी सोपविण्याची प्रक्रीया यासाठी www.mumbaisuburban.gov.in या वेबसाईटवर अथवा जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर जिल्हा यांचेशी संपर्क साधावा.

स्थळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी यांची सहि असे

स्वाक्षरीत/-
**(मिलिंद बोरीकर)**
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

प्रत:-कार्यकारी अभियंता (प), मुं.झो.सुं.मंडळ यांना कार्यवाहीसाठी अग्रेषित.

(संजय काळे)
जिल्हा नियोजन अधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा